# छत्रपती शिवाजी महाराज यांची लष्कर व्यवस्था : एक अभ्यास

**डॉ. मोतीराज रामदास चव्हाण**
इतिहास विभाग प्रमुख
भिवापुर महाविद्यालय, भिवापुर जिला- नागपुर
(महाराष्ट्र राज्य) मो. ९३७३६ ०५११२)

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन काळात आदर्श राज्य निर्माण केले होते. मध्ययुगीन काळातील मोगल राजे यांच्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य अधिकच महत्त्वाचे आहे. काही इतिहासकार छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना नेपोलियनशी करतात. छत्रपती शिवाजी महराज जेवढे प्रशासनाला महत्त्व देत. तेवढेच स्वराज्यालाही देत असत. छत्रपती शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी तयार केलेली लष्कर व्यवस्था आणि त्याचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिस्तबद्ध सैन्य रचनेमुळे मराठ्यांना बऱ्याच मोहिमांमध्ये हमखास यश मिळायचे. शत्रूसैन्याची फळी फोडत असताना मराठी फौज विस्कळीत होणार नाही याची छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमी दक्षता घेतलेली होती. त्यामुळे सैन्याला लढाईवर जातानाच आत्मविश्वास निर्माण व्हायचा. प्रत्येकाला जेवढे काम दिलेले असायचे तेवढेच त्याने चोखपणे बजावले की यश हमखास मिळायचे. महाराज जेवढ्या कुशलतेने युद्ध मोहिमांचे नियोजन करायचे, तेवढ्याच कठोरतेने त्यांचे शिलेदार आणि मावळे त्यांची अंमलबजावणी सुद्धा करायचे. प्रस्तुत शोध निबंधात छत्रपती शिवाजी महाराज यांची लष्कर व्यवस्थेचा अभ्यास केला आहे.

**KEY-WORD :** गनिमीकावा, हेरखाते, लष्कर, युद्ध, पायदळ, घोडदळ, किल्ले, आरमार, हत्तीदळ, उंटदळ.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. छत्रपती शिवाजी महाराजांची लष्कर व्यवस्था समजून घेणे.
२. शिवकालीन लष्कर व्यवस्थेच्या धोरणांचा अभ्यास करणे.
३. शिवकालीन लष्करी व्यवस्थेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. शिवाजी महाराजांनी भविष्यकालीन लष्कर व्यवस्था ओळखली होती.
2. शिवाजी महाराजांनी युद्ध मोहिमेच्या वेळी लष्कर व्यवस्थेचा उपयोग केला होता.
3. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या व्यवस्थेचा धोका ओळखून त्यावर लष्कर व्यवस्थांचे नियोजन केले होते.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्यात आलेला आहे. छत्रपती

शिवाजी महाराज यांची लष्कर व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी ग्रंथालय सेवा क्षेत्रातील उपलब्ध असलेल्या दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. तसेच कार्यालयातील माहितीचा आधार घेतलेला आहे. प्रस्तूत लेखनासाठी संख्याशास्त्रीय पद्धती व संदर्भ संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी संशोधन प्रबंध, वृत्तपत्रातील बातम्या, नगरपालिका वार्षिक अहवाल, प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, सरकारी व नियतकालिके, गॅझेटिअर्स, शब्दकोश व विविध लेखांचा आधार घेतलेला आहे व सर्वात शेवटी संदर्भग्रंथाची सर्वसमावेशक यादी दिलेली आहे.

**लष्करी व्यवस्थेचे घटक :**

कोणतेही राज्य हे त्यांच्या उत्तम प्रशासनामुळे टिकते. स्वराज्याच्या प्रशासनाचा विचार करावयाचा झाल्यास नागरी प्रशासनाचे उत्तम उदाहरण शिवाजी महाराजांनी घालून दिले होते. कल्याणकारी राज्य उभारणाऱ्या शिवाजी महाराजांनी उत्तम अशा लष्करी प्रशासनाचीही उभारणी केलेली दिसते. या लष्कर व्यवस्थेत पायदळ, घोडदळ, किल्ले, आरमार, आणि हेरखाते हे प्रमुख घटक होते.

परंपरागत सरंजामशाहीला थारा न देता श्रेणीबध्द अधिकाऱ्यांच्या ताब्यात लष्कर होते. त्यावेळीच एकूण राजकीय परिस्थिती, महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, आर्थिक मर्यादा, परंपरागत सैन्यव्यवस्थेतील दोष या सर्व गोष्टी लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी सैन्याची उभारणी केली. महाराष्ट्रात व विशेषतः ज्या प्रदेशात स्वराज्याची निर्मिती झाली तेथे हत्तीदळ, उंटदळ, घोडदळ यांच्यापेक्षा पायदळाचा अधिक उपयोग करून घेण्याकडे त्यांचा कल होता. त्यामुळे पायदळ हे लष्कराचे अत्यंत महत्त्वपूर्ण अंग होते. आर्थिक शक्ती व सैन्यशक्ती यांचा विचार करता शत्रुपुढे समोरा समोर युध्द करणे आत्मघातकीपणाचे ठरले असते. त्यामुळे गनिमी कावा (Gaurilla war) या युध्दतंत्राचा अत्यंत प्रभावीपणे वापर शिवाजी महाराजांनी केला. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील आरमाराचा जनक म्हणून शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. आरमाराचे महत्त्व जाणणारे व यानिमित्ताने स्थानिक लोकांच्या मदतीने आरमार उभारणारे शिवाजी महाराज निश्चितच द्रष्टे समजले पाहिजेत. अत्यंत कार्यक्षम हेरखाते हे शिवाजी महाराजांच्या लष्करव्यवस्थेचे वैशिष्टय होते.

**१) संरक्षक दल :**

छत्रपती हे सर्व राज्याचे प्रमुख होते. त्यांच्या संरक्षणासाठी खास सैनिक होते. त्यांचे संरक्षण ही सर्वांत महत्त्वाची, अत्यंत जोखमीची अशी जबाबदारी या सैन्यावर होती. हे सैन्य अत्यंत प्रामाणिक व कार्यक्षम असे होते. संरक्षक दलात बंदूकधारी, भालेकरी, हलकी हत्यारे चालवणारे, तोफखाना बाळगणारे इ. प्रकारचे हत्यार बंद लोक होते. राज्याच्या रक्षणाबरोबरच आणीबाणीच्या प्रसंगी राखीव सैन्य म्हणून त्यांचा उपयोग होत असे. पराक्रमी, विश्वासू अशा निवडक सैनिकांनाच यामध्ये सामाविष्ट केले जात असे. त्यांना विशेष असा पोषाख व हत्यारे दिली जात. शिवाजी महाराजांच्या सतत अवतीभोवती असणाऱ्या या शरीर रक्षकांना पगारही सर्वसामान्य सैनिकांपेक्षा अधिक होता.

**२) पायदळ :**

स्वराज्यस्थापनेच्या अगदी सुरूवातीपासून कार्यरत असणारे सैन्य म्हणजे पायदळ, महाराष्ट्रातील मावळे

हे पायदळाचे प्रमुख घटक होते. काटक, चपळ, शूर अशा मावळयांचे हे सैन्य डोंगरदऱ्यातील किल्ल्यांच्या रक्षणासाठी विशेष उपयुक्त होते. जसे मावळे तसेच कोकणातील हेटेकरीसुध्दा पायदळात होते. शिपाई हा पायदळातील सर्वांत लहान अथवा तळातील घटक होता. १० पायदळ शिपायांवर एक नाईक होता. ५० शिपायांच्या म्हणजे ५ नाईकांची एक तुकडी असे. या तुकडीवर हवालदारीची नेमणूक केलेली होती. २ हवालदाराचा म्हणजे १०० शिपायांचा अधिकारी म्हणजे एक जुमलेदार अशा दहा जुमलेदारांवरील अधिकारी म्हणजे एक हजारी अधिकारी पंचहजारी अधिकाऱ्याला सरनोबत म्हटले जात असे.

या सर्व सैन्य अधिकाऱ्यांना वार्षिक पगार दिला जात होता. सरनोबत या अधिकाऱ्याला २,५०० होन वर्षाला मिळत असत. एक हजारी अधिकाऱ्याला ५०० होन पगार होता. जुमलेदाराला वर्षाला १०० होन इतका पगार होता. हवालदाराला दर महिना ३ होन इतका पगार होता. नाईकाला दर महिन्याला १ ते ३ होन इतका पगार मिळत असे. शिवाजी महाराजांच्या लष्कर व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक म्हणजे पायदळ होते.

### ३) घोडदळ :

तत्कालीन लष्करव्यवस्थेत घोडदळाला अनन्यसाधारण महत्त्व होते. चपळतेने सैन्याच्या हालचाली करण्यासाठी, दूरवरच्या प्रदेशापर्यंत धडक मारण्यासाठी, आक्रमणासाठी कार्यक्षम व चपळ अशा घोडदळाची महती फार होती. शिवाजी महाराजांनी जे घोडदळ उभारले त्याचे दोन भाग होते. १) पागा बारगीर २) शिलेदार बारगीर म्हणजे सरकारी नोकर असलेला घोडेस्वार या सैन्याचे घोडे, हत्यारे सरकारने त्यांना पुरवलेली असत. शिलेदार हे स्वतंत्र होते. त्याचा घोडा व हत्यारे त्यांच्या स्वतःच्या मालकीची होती. काही काळापुरते ते राजाच्या सैन्यात युध्दासाठी येत. तेवढा पगार त्यांना मिळत असे. सहसा शेती व शेतीची कामे करून उरलेल्या वेळेत सरकारी चाकरी करणारे हे मराठे होते.

घोडदळातही श्रेणीबध्द रचना होती. २५ घोडेस्वारांवर एक हवालदार, पाच हवालदारांवरचा अधिकारी म्हणजे एक जुमलेदार. १० जुमलेदारांवर एक सुभेदार. १० सुभेदारांवर एक अंमलदार अशी चढतीश्रेणी होती. या अधिकाऱ्यांचे पगार निश्चित केलेले होते. जुमलेदाराला वर्षाला ५०० होन इतका पगार होता. सुभेदाराला वर्षाला १००० होन इतका पगार होता. सर्व घोडदळाचा प्रमुख म्हणजे सरनोबत हाच मराठी सैन्याचा सेनापती होता. अष्टप्रधान मंडळात सामाविष्ट असणाऱ्या या अधिकाऱ्याला १०,००० होन वर्षाला मिळत असत. शिलेदारालाही पगार मिळत असे. त्याचा पगार बारगीरापेक्षा जास्त होता. घोडदळाच्या छावण्यांचीही व्यवस्थितपणे तरतूद केली जात होती. निवाऱ्याची जागा, पुरेसे धान्य, औषधपाणी, घोडयांसाठी गवत अशा सर्व आवश्यक अशा बाबींची पूर्तता केली जात असे.

### ४) किल्ले :

राज्याचे सार ते दुर्ग' अशा शब्दांत किल्यांचे वर्णन आज्ञापत्रात केले आहे. स्वराज्यनिर्मिती ही किल्यांपासूनच झालेली आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात किल्यांना फार महत्त्व होते. परकीय आक्रमणांपासून संरक्षण करण्यासाठी किल्यांचा उपयोग होत असे. त्यामुळेच किल्ले जिंकणे, नविन किल्ल्यांची बांधणी करणे, सीमा प्रदेशांवरील किल्ल्यांची दुरूस्ती, तेथील रसदीची व्यवस्था या सर्व बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात

होते. त्या काळातील युध्दांमध्ये किल्यांना फार महत्त्वाचे स्थान होते. शिवाजी महाराज किल्यांचे महत्व जाणून होते. म्हणून त्यांनी किल्यांबाबतही विशेष निती अवलंबिली.

शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्यात किती किल्ले होते. याबाबत मतभिन्नता आहे. चिटणीस बखरीत ही संख्या ३१७ आहे. तर सभासदाने ही संख्या २४० दिली आहे. चित्रगुप्त किल्ल्यांची संख्या ३६१ इतकी देतो. वा. कृ. भावे यांनी शिवकालीन महाराष्ट्र या ग्रंथात शिवकालीन किल्ल्यांची संख्या २४० असण्याचा निर्वाळा दिला आहे. त्याचे वर्गीकरणही ते पुढे करतात. किल्ल्यांचे तीन प्रकार समजले जातात.

१) स्थलदुर्ग (जमिनीवरील किल्ले) २) जलदुर्ग (सागरी किल्ले) ३) गिरीदुर्ग (डोंगरावरील किल्ले) शिवाजी महाराजांच्या काळात सुरूवातीला तरी गिरीदुर्गाचे फार महत्त्व होते. स्वराज्य निर्मिती व स्वराज्य विस्तारात या किल्ल्यांचा मोठा सहभाग होता. शिवाजी महाराजांनी अनेक जुन्या किल्ल्यांची दुरूस्ती केली. ते किल्ले आणखी दूर्गम व बळकट बनवले. किल्ला लढवता यावा म्हणून शिबंदी वाढवली. उदा. रायरीचा किल्ला जिंकल्यानंतर अनेक कडे तासून दुर्गम बनवले. काही ठिकाणी सुरंग लावून पायऱ्या बनवल्या. हत्ती, घोडे, उंट, गढावर चढवले, तलाव बांधून पाण्याची सोय केली. इमारती बांधल्या, बाजारपेठ बांधली. का किल्ला इतका चांगला बांधला की तो स्वराज्याची राजधानीच झाला. सिंधुदुर्ग व विजयदुर्ग हे नवीन दोन जलदुर्ग शिवाजी महाराजांनी बांधले. किल्ला बांधण्यासाठी शिवाजी महाराजांनी परंपरागत कलाकार व वेळप्रसंगी पाश्चात्य वास्तूशास्त्राज्ञांचीही मदत घेतली.

किल्यांच्या व्यवस्थापनातही शिवाजी महाराजांनी दक्षता घेतली होती. प्रत्येक किल्ल्यावर समान दर्जाचे तीन अधिकारी असत. हवालदार हा किल्ल्यावरील शिबंदीचा प्रमुख असे. सहसा हवालदार हा मराठा जातीचा असे. सबनीस हा दुसरा अधिकारी होता. तो किल्ल्याचा अर्थव्यवहार पाहत असे. तर कारखानीस हा तिसरा अधिकारी धान्यपुरवठा करणारा अधिकारी होता. हवालदारावर किल्ल्याच्या प्रत्यक्ष रक्षणाची जबाबदारी असे. किल्यांच्या व्यवस्थापनाबाबत शिवाजी महाराज अत्यंत दक्ष होते. ते स्वतः आकस्मितपणे किल्ल्यांना भेटी देत. किल्यांच्या तपासणीच्या कामावर त्यांनी अण्णाजी दत्तो या मंत्र्याची खास नेमणूक केली होती.

**५) आरमार :**

डॉ सेन म्हणतात की "Shivaji may be described as the father of the Indian navy." शिवाजी महाराजांनी स्वातंत्र आरमाराची निर्मिती केली. शत्रूपासूनच बचाव करण्यासाठी, पश्चिम किना-यावरील व्यापार ताब्यात घेण्यासाठी, स्वराज्याचा वापर वाढवून सांपत्तिक स्थिती बळकट करण्यासाठी, स्वतःचे आरमार असल्यास पोर्तुगीज अथवा अन्य परकीय सत्तांपुढे झुकावे लागू नये म्हणून शिवाजी महाराजांनी आरमाराची निर्मिती केली. स्थानिक कोळी व भंडारी लोकांच्या मदतीने आरमारची उभारणी केली. १६५९ पासून आरमार निर्मितीला सुरूवात झाली. शिवाजी महाराजांनी आरमारी तळ व बंदरे यांची बांधणी केली. युध्दनौका बांधणे, त्या दुरूस्त करणे, वादळी हवामानाच्या वेळी योग्य संरक्षण मिळविण्यासाठी बंदराची निर्मिती करणे यासाठी त्यांनी हालचाली केल्या. स्वराज्याच्या संरक्षणासाठी पश्चिम किनारपटटीवर भक्कम किल्ले उभारणे व उत्तम आरमारी तळ उभारणे याला त्यांनी प्राधान्य दिले. याच दरम्यान त्यांनी विजयदुर्ग हा अत्यंत सामर्थ्यशाली जलदुर्ग बांधला.

आरमाराचे संरक्षण किनाऱ्यावरील किल्ले व खाडया यांच्या आश्रयाने होत असते. शांततेच्या काळात वादळापासून बचावासाठी खाड्या उपयोगी असतात. युध्दकाळात किल्ले व खाडया यांना मोक्याची ठिकाणे म्हणून महत्त्व असते हे ओळखून कोकण किनाऱ्यावर शिवाजी महाराजांनी जुने किल्ले दुरूस्त केले व नवे बांधले.

मालवणचा सिंधुदूर्ग हा सुध्दा त्यांनी बांधून घेतलेला किल्ला आहे. इंग्रजांना शह देण्यासाठी, युध्दनौका, व व्यापारी नौका यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने खांदेरीचा किल्ला बांधला. हा किल्ला म्हणजे एक चांगला आरमारी तळ झाला. रत्नागिरी, अंजनवेल, राजापूर याठिकाणीही छोटे-छोटे आरमारी तळ बांधले. गुराबा, गलबत, शिवाडे, तरांडी, तारवे व पगार अशा सहा प्रकारच्या नौका शिवाजी महाराजांच्या आरमारात होत्या. गुलाबा या मुख्य युध्द नौका होत्या. आरमारातही श्रेणी पध्दत होती. पाच गुलाबा व पंधरा गलबते मिळून एक सुभा होत होता. सर्व सुभ्यांवर एक सरसुभा होता. आरमाराचा सर्वांत मोठा अधिकारी म्हणजे दर्यासारंग. मायनाक हा सुध्दा आरमाराचा अधिकारी होता. शिवाजी महाराजांचे वाढते आरमारी सामर्थ्य पाहून पोर्तुगीजांना काळजी वाटत होती. याच आरमाराच्या जोरावर शिवाजी राजांनी सिद्दी, पोर्तुगिज, इंग्रज यांच्या आक्रमणाला मर्यादा घातल्या. इराण व अरबांशी व्यापार करण्यासाठी या आरमाराचा उपयोग झाला. या सामर्थ्यामुळे युरोपियन व्यापाऱ्यांवर जरब बसली होती.

**६. हेरखाते :**

राज्यातील हेर म्हणजे जणू काही राजाचे डोळे व कानआहेत असे म्हटले आहे. आपल्या राज्यात आणि शत्रू राज्यात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीची माहिती राजांना हेरामार्फत कळत होती. शिवाजी महाराजांच्या लष्कर व्यवस्थेतील हा महत्त्वाचा घटक होता. अत्यंत विश्वासू व कार्यक्षम असे लोक हेरखात्यात होते. हेरखात्यातील हेरांची निश्चित संख्या विश्वसनीयरित्या उपलब्ध नाही. या खात्याचा प्रमुख बहिर्जी नाईक (जाधव) हा होता. कोणालाही अशक्यप्राय वाटाव्या अशा मोहिमा शिवाजी महाराजांनी यशस्वी केल्या. शत्रूच्या प्रदेशात जाऊन ते सहिसलामत परत आले. शत्रूची सधन शहरे लुटली अशा सर्व प्रसंगात ते यशस्वी झाले. त्याचे एक कारण म्हणजे त्यांचे प्रामाणिक व कार्यक्षम हेरखाते होते. विशेषतः बहिर्जी नाईक याने अनेक वेळेला वेषांतर करून शत्रूप्रदेशाची बारीक सारीक माहिती शिवाजी महाराजांपर्यंत पोहोचवली होती. पहिल्या सुरत लुटीच्या वेळी सुरतेच्या नगर संरक्षणाची माहिती, सुरतेतील व्यापाऱ्यांची व त्यांच्या संपत्तीची इथंबूत माहिती राजांना पुरविली होती.

शिवकाळात सैन्यव्यवस्था व सैन्यप्रशासन हे कठोर शिस्तीचे होते हे लक्षात येते. मराठे यापूर्वीही युध्द करीतच होते पण ते इतर शाहयांसाठी करीत होते. युध्दसाहित्य, युध्दतंत्र लष्कर प्रशासन अस्तित्वात होते. शिवाजी राजांनी यातील दोष दूर करून आपल्या परिस्थितीशी अनुकूल असे रूप त्याला दिले. सैन्याला शिस्तबध्दता, कार्यक्षमता, राज्यनिष्ठेची जोड दिली, मराठ्यांचे सैन्य संख्येने कमी असले तरी ते यशस्वी होण्याची कारणे ही या लष्करी प्रशासन व्यवस्थेत दिसून येतात. या यशाने त्यांना आत्मविश्वास दिला.

**निष्कर्ष :**

मराठेकालीन गुप्तहेर यंत्रणा अत्यंत कार्यक्षम होती. त्यामुळेच शिवाजी महाराजांनी अनेक विजय मिळवलेले दिसून येतात.

१) प्रत्येक मोहिमेच्या पूर्वी आपल्या हेरखात्यांमार्फत शत्रूची इत्यंभूत माहिती मिळाल्याने शत्रूच्या दुर्बळ जागा हेरून विजय मिळवता आले. सेनापतीबरोबर सैन्याचा वृत्तांत लिहिणारे काही अधिकारी असत.

२) वाकनीस नावाचा अधिकारी सेनापतीच्या हाताखाली असे. तो सैन्याचा एकूण वृत्तांत लिहित असे. कार्यवाह नावाच्या अधिकारी सैन्याची अधिकृत दैनंदिनी लिहित असे. परंपरागत लष्करव्यवस्थेतील दोष नष्ट करून सैन्य उभारण्यात आले.

३) सैन्याच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केल्यामुळे सैन्याची हानी कमी झाली. शस्त्रास्त्र निर्मिती केली. रोख पगार, योग्य कामगिरीसाठी योग्य बक्षिस यामुळे सैन्याला प्रोत्साहन मिळाले.

४) स्वराज्य निर्मितीच्या वेळी मराठ्यांना फार मोठ्या संकटांना तोड द्यावे लागत होते. सैन्य, प्रदेश, पैसा या सर्वच बाबतीत मुस्लीम राजवटी प्रबल होत्या. गनिमी काव्याच्या युध्दतंत्राचा योग्य रितीने वापर करून घेतल्याने हे लष्करी प्रशासन प्रभावी ठरले.

५) गनिमी कावा युध्दतंत्राचा अवलंब केल्याने मराठयांचे सैन्यबळ कमी असले तरी चपळ व वेगवान हालचाली करणाऱ्या मराठयांनी मोठमोठे सैन्य बाळगणाऱ्या मुघलांच्या सैन्यास सळो की पळो केले.

**संदर्भग्रंथ :**


- मेढे एस. आर., गवळी एस.एन., डुंब्रे जी.आर., देशमुख जे.एस.- व्यवसाय व्यस्थापन (२०१४), सक्सेस पब्लिकेशन पुणे, पृ.क्र.
- शेळके पंतोजी व डोके अजिनाथ- व्यवसाय व्यस्थापन (२०१४), डायमंड पब्लिकेशन पुणे., पृ.क्र. २.
- देशमुख प्रभाकर आणि देशमुख रवींद्र - व्यवसाय व्यस्थापन (२०१४), पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन नागपूर, पृ.क्र.४९.
- आठल्ये विभा, मराठ्यांचा इतिहास-(२०००), अंशुल पब्लिकेशन नागपुर, पृ.क्र. २२१ व २२२.